# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८.

## मा. ह प्रभाग समिती सभा

## कार्यपत्रिका क्रमांक - १४

## सभा वृत्तांत

दिनांक - ०७/०३/२०१९ वेळ. दुपारी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. ह प्रभाग समिती मासिक सभा गुरुवार दि.०७/०३/२०१९ रोजी दुपारी १२.०० वाजता ह क्षेत्रीय कार्यालयातील " पं. दीनदयाळ उपाध्याय " सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा. नगरसदस्य / नगरसदस्या उपस्थित होते.

| अ.क्र. | सन्मा. सदस्यांची नावे | |
|---|---|---|
| १ | मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत | सभापती |
| २ | मा.शाम गणपतराव लांडे | सदस्य |
| ३ | मा.सुजाता सुनिल पालांडे | सदस्या |
| ४ | मा.बनसोडे राजू विश्वनाथ | सदस्य |
| ५ | मा.आशा धायगुडे - शेंडगे | सदस्या |
| ६ | मा.स्वाती (माई) चंद्राकांत काटे | सदस्या |
| ७ | मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे | सदस्य |
| ८ | मा.राजापुरे माधवी राजेंद्र | सदस्या |
| ९ | मा.संतोष बबन कांबळे | सदस्य |
| १० | मा.सोनवणे शारदा हिरेन | सदस्या |
| १११ | मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे | सदस्या |
| १२ | मा.संजय कणसे | स्वीकृत सदस्य |

याशिवाय सदरचे सभेस खालील अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.
श्रीम.आशा राऊत प्रशासन अधिकारी तथा , क्षेत्रीय अधिकारी, श्री.संजय खाबडे, कार्यकारी अभियंता (वि), श्री.केशवकुमार फुटाणे,कार्यकारी अभियंता (स्था) , श्री.धनंजय गवळी, उप अभियंता(स्था), श्री.विजयसिंह भोसले, उप अभियंता(स्था), श्री.ए.बी.कोंडे, उप अभियंता (जलनिस्सारण), श्री.दिलीप धुमाळ उप अभियंता(वि), श्री.मोहन ईश्वर खोद्रे, उप अभियंता (झोनिपु), श्री.समीर दळवी, कनिष्ठ अभियंता(वि), श्री.सुरेखा सुधीर कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता अभियंता (पा.पु.), श्री.एस.पी. बनसोडे, कनिष्ठ अभियंता, श्री.सचिन सानप, कनिष्ठ अभियंता(स्था), श्री.महेंद्र देवरे, कनिष्ठ अभियंता(स्था), श्री.ए.एस.मोरे, कनिष्ठ अभियंता(स्था), श्री.संजय जाधव, मु.आरोग्य निरीक्षक, श्री.सुनिल चव्हाण, आरोग्य निरीक्षक, श्री.एस.जी.इनामदार, आरोग्य निरीक्षक, श्री.उद्धव डवरी, आरोग्य निरीक्षक, श्री.कोटीयाना डी.एस., आरोग्य निरीक्षक, श्री.जे.व्ही पटेल, उद्यान अधिक्षक, श्री.एस.बी. लांडगे, उद्यान सहाय्यक, श्री.राजू शिरसाठ, उद्यान सहाय्यक, श्रीम.जयश्री साळवी, क्रीडा पर्यवेक्षक, श्री.आत्माराम महाकाळ, सहा. उद्यान सहाय्यक, श्रीम.महादेव बोत्रे,एम.एस.डब्लू. वा.सी.एम.एच.

मा.सभापती – उपस्थित सन्मा.सदस्य अधिकारी / कर्मचारी सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत आली.

१. दिनांक-१०/०१/२०१९ रोजी दुपारी १२.०० वा झालेल्या सभेचा (कार्यक्रम पत्रिका क्र.१२) चा सभावृतांत कायम करणे.

२. दिनांक-०७/०२/२०१९ रोजी दुपारी १२.०० वा झालेल्या सभेचा (कार्यक्रम पत्रिका क्र.१३) चा

सभेमध्ये प्रभागातर्गंत कामकाजावर सांगोपांग खालीलप्रमाणे चर्चा झाली.

१. मा.उषा ऊर्फ माई ढोरे, नगरसदस्या यांनी प्रलंबित कामकाज पुर्ण होणेकामी फेरनिविदा काढणेबाबत संबंधित विभागाना सुचना केल्या.

२. मा.उषा ऊर्फ माई ढोरे, नगरसदस्या यांनी पाणी पुरवठा विभागाकडे नव्याने नेमणूका झालेले उप अभियंता,कनिष्ठ अभियंता यांचे प्रभागनिहाय नेमणूका आदेश प्रती मिळणे बाबत सुचना मांडली.

३. मा.स्वाती (माई) ढोरे, नगरसदस्या यांनी प्रभागातर्गंत कुत्रे आणि डुकरांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली असलेने, भटके कुत्रे जेष्ठ नागरिकाला चावल्याने प्रभागाल भटकी कुत्रे पकडणेकामी तातडीने कार्यवाही करणेकामी संबंधित पशूवैद्यकीय विभागास सुचना केल्या.

४. मा.स्वाती (माई) ढोरे, नगरसदस्या यांनी आगामी निवडणूकीसाठी ह क्षेत्रीय कार्यालयाकडील सहा.आरोग्य अधिकारी यांची निवडणूक ड्युची रद्द करणेकामी संबंधित विभागाकडे कळविणेकामी सुचना केल्या.

५. मा.स्वाती (माई) ढोरे, नगरसदस्या यांनी विद्युत विभागाकडील काय कामकाज चालले आहे. याबाबत संबंधिताकडून माहिती घेऊन, माझे प्रभागात प्रलंबित विद्युत विषयक कामकाज करावे याबाबत सुचना मांडली.

६. मा.शारदा सोनवणे, नगरसदस्या यांनी कचरा वाहतुक गाड्या मोठ्या प्रमाणात ना-दुरूस्त होतात. याकामी मा.प्रभागा समिती सभेसाठी कार्यशाळेकडील संबंधित अधिकारी यांना बोलविणे बाबत सुचना मांडली.

७. मा.शारदा सोनवणे, नगरसदस्या यांनी माझे प्रभागातील चेंबरची कामकाज प्रलंबित आहे. त्यामुळे नागरिक सदरचे खड्ड्यात पडून जखमी होण्याची शक्यता आहे. तसेच चेंबरची लेवल आणि रोडची लेवल समान होईल याची काळजी घेऊन कामकाज तातडीने करणेकामी संबंधितास सुचना केल्या.

८. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत, सभापती- प्रभाग कार्यक्षेत्रामध्ये वेळोवेळी रस्ते खुदाई केली जाते. सध्या परिक्षेचे दिवस असून, पाणी पुरवठा, स्ट्रीट लाईट व घरगुती लाईट कनेक्शन तुटते. त्यामुळे नागरिकांची व विद्यार्थ्यांची गैरसोय होते. त्यामुळे कामकाज करताना काळजी घ्यावी, याबाबत सुचना मांडली

उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीप्रमाणे खालीलप्रमाणे ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.१ गाव मौजे दापोडी स.न.८५/अ/२ मधून डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते भाऊ पाटील पुल रोड बाबत मा.स्वाती (माई) काटे, मा.राजू बनसोडे यांचा प्रस्ताव

विषय क्र.२ प्रभाग क्र.२० संत तुकारामनगर येथील गोल मंडईच्या पाठीमागे रस्त्याला माता रमाई आंबेडकर मार्ग असे नाव देणे बाबत - मा.उषा ऊर्फ माई मनोहर ढोरे, मा. सुजाता पलांडे यांचा प्रस्ताव

विषय क्र.३ दापोडी हुतात्मा भगतसिंग शाळा इमारत पाडून नवीन शाळा इमारत बांधणेच्या कामाबाबत - मा. आशा धायगुडे – शेंडगे यांचा प्रस्ताव

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.

ठराव क्र.४६ विषय क्र.१

दि.०७/०३/२०१९ विभाग – स्थापत्य

सुचक:- मा.राजू बनसोडे अनुमोदक:- मा.स्वाती (माई) काटे

संदर्भ:- मा.स्वाती (माई) काटे, मा.राजू बनसोडे यांचा दि.०७/०३/२०१९ चा प्रस्ताव

गाव मौजे दापोडी स.न.८५/अ/२ मधून डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते भाऊ पाटील पुल रोडला १८ मी. पर्यायी रोड करणेत आला असून, सदर जागेतून जाणार ३० मी. रोड २० मी. करून एकेरी वन-वे रोड करणेत यावा. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वांनमते मान्य झाला.

ठराव क्र. ४७

दि.०७/०३/२०१९

सुचक:- मा.सुजाता पलांडे

विषय क्र.२

विभाग – स्थापत्य

अनुमोदक:- मा.उषा ऊर्फ माई मनोहर ढोरे

संदर्भ:- मा.उषा ऊर्फ माई मनोहर ढोरे, मा. सुजाता पलांडे यांचा दि.०७/०३/२०१९ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.२० संत तुकारामनगर येथील गोल मंडईच्या पाठीमागे रस्त्याला माता रमाई आंबेडकर मार्ग असे नाव देणे बाबत सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्र. ४८

दि.०७/०३/२०१९

सुचक:-

विषय क्र.२

विभाग – स्थापत्य

अनुमोदक:-

संदर्भ:- मा. आशा धायगुडे – शेंडगे यांचा दि.०७/०३/२०१९ चा प्रस्ताव

दापोडी हुतात्मा भगतसिंग शाळा ही पुणे मनपाच्या हद्दीत असताना बांधलेली आहे. ही शाळा सध्यस्थितीत जुनाट झाली असल्याने तसेच ब-याच ठिकाणी स्लॅब कोसळत असल्याने व ब-याच ठिकाणी क्रॅक पडल्याने सदरची शाळा धोकादायक झालेली आहे. सदरची शाळा स्ट्रक्चरल इंजिनिअरने तपासून त्याचा अहवाल दिलेली आहे. या अहवालात शाळा इमारत धोकादायक दिसून येते. तरी मा.प्रभाग समितीत सदरची शाळा पाडून नवीन बांधणे बाबत सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपलेचे जाहीर केले.

(मा.अंबरनाथ चंद्रकांत कांबळे)
सभापती, ह प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

जा.क्र. हक्षेका/सभा//कावि/ ८३ /२०१९
दिनांक:- ०८/०३/२०१९

प्रशासन अधिकारी
तथा
सचिव (सभाशाखा)
ह प्रभाग समिती

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर